**वेळ : ३ तास** **बोर्ड पेपर – मार्च २०२२** **एकूण गुण : ८०**

## विभाग – १ : गद्य

**प्रश्न १. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(१) चौकटी पूर्ण करा. [०२]

(i) उताऱ्यात आलेले नदीचे नाव – ☐

(ii) बाळाची आई करत असलेला उद्योग – ☐

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात एक बाई माझ्या खिडकीखालील घाटाच्या छोट्या तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उद्योगात होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत होते; पण आई तिकडे बघतही नव्हती. मला मात्र राहवले नाही. मी सुटकेसमधील पुलकित शाल काढली. पाचपन्नास रुपयांच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली. खिडकीतून ते सर्व खाली दिले आणि म्हटले, ''त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारत बैस.'' या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा, संमेलने गाजवत. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामतः त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, ''या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे.

(२) आकृतीबंध पूर्ण करा. [०२]

☐ ← कार्यक्रमात नारायण सुर्वे यांना सन्मानाने मिळणाऱ्या वस्तू → ☐

(३) स्वमत. [०३]

'शाल व शालीनता' यांचा पाठाच्या आधारे तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

**प्रश्न १. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(१) कोण ते लिहा. [०२]

(i) निरंजनचा सर्व खर्च करणारे –

(ii) निरंजनला मावशीकडे सोडून पुन्हा न परतलेला –

**प्रश्न १. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(१) कोण ते लिहा. [०२]

(i) निरंजनचा सर्व खर्च करणारे –

(ii) निरंजनला मावशीकडे सोडून पुन्हा न परतलेला –

मामा गेला तो पुन्हा परतला नाही मात्र लहानगा निरंजन मावशीच्या घरी प्रामाणिकपणे काम करायचा. घरातल्या सर्वांशी त्याने जमवून घेतलं आणि शाळेत नाव दाखल केलं. मावशीची परिस्थिती यथातथाच असल्याने निरंजन वार लावून जेवायचा. पहिल्याच वर्षी त्याची अभ्यासातली प्रगती पाहून भडसावळे गुरुजींनी त्याला थोरामोठ्यांच्या घरी वार लावून दिले. दररोज एकाच्या घरी दुपारी निरंजन पाहुणा म्हणून जेवायला जायचा, मग तिथून शाळेत. संध्याकाळी मात्र मावशीकडे जे काही मिळेल त्यावर राहायचा. सकाळी लवकर उठून घरातली, गोठ्यातली सारी कामं आटपून अभ्यासाला बसायचा. गुरुजींवर श्रद्धा ठेवायचा आणि परीक्षेत पहिला नंबर पटकवायचा. त्याच्या वह्या-पुस्तकांचा खर्च भडसावळे गुरुजीच करायचे. गुरुजींनी त्याला सांगितलं, की ‘जोपर्यंत तुझा पहिला नंबर आहे, तोपर्यंतच मी सारा खर्च करीन आणि वारही लावून देईन. नाही तर नाही.’ गुरुजींचं हे वाक्य लक्षात ठेवून निरंजन झटून अभ्यास करायचा. आज नागरिकशास्त्राचा अभ्यास करत असताना आधीचे सगळे पेपर्स चांगले गेले असल्याने तो मनोमन खूश होता.

(२) का ते लिहा. [०२]

(i) निरंजन वार लावून जेवायचा, कारण ______.

(ii) निरंजन झटून अभ्यास करायचा, कारण ______.

(३) स्वमत.


तुम्हांला अभिप्रेत असलेली आदर्श विद्यार्थ्याची गुणवैशिष्ट्ये लिहा. [०३]

### अपठित गद्य

**प्रश्न १. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(१) आकृतिबंध पूर्ण करा. [०२]

संकटांकडे पाहण्याची दृष्टी अशी असावी



अडचणींनी आणि रोगांनी भांबावून जाण्याचे काय कारण आहे? संकटे ही काही कायमची नसतात ना? मग त्यांच्याकडे सोशिकपणे, खिलाडू वृत्तीने पाहण्याची दृष्टी का असू नये? संकटांचे जेव्हा आपल्यावर आक्रमण होते, तेव्हा ती फार मोठी किंवा असह्य वाटतात; परंतु ती ओसरल्यावर, आपण त्यांना का घाबरलो तेच आपल्याला समजत नाही. आपण घाबरतो याचे कारण आपल्याजवळ मनाची स्थिरता किंवा शांती नसते. मनाची शांती नसते याचे कारण अडचणींचे खरेखुरे स्वरूप आपणांस कळलेले नसते. जीवन म्हणजे संकटे नव्हेत, कारण ती असतानाही जीवन चालूच असते. मळभ आल्याने सूर्य जसा नाहीसा होत नाही, त्याचप्रमाणे रोगांनी नि संकटांनी जीवनाचे मूळ आनंदी स्वरूप नाहीसे होत नाही. आजारी व संकटग्रस्त माणसेही जेव्हा थट्टा-विनोद करतात, तेव्हा ती या आनंदमय जीवनाचा अनुभव घेत असतात.

(२) कधी ते लिहा. [०२]

(i) आपण संकटांना का घाबरलो तेच आपल्याला समजत नाही.

(ii) आजारी, संकटग्रस्त माणसे आनंदमय जीवनाचा अनुभव घेत असतात.

## विभाग – २ : पद्य

**प्रश्न २. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** [०२]

(१) योग्य पर्याय निवडा.

(1) सैनिकाचे औक्षण केले जाते........

(i) भरलेल्या अंतःकरणाने

(ii) डोळ्यांतील आसवांच्या ज्योतींनी

(iii) तबकातील निरांजनाने

(iv) भाकरीच्या तुकड्याने

(2) कवितेतील 'दीनदुबळे' म्हणजे........

(i) कष्टाचे, पैशाचे सामर्थ्य नसलेले

(ii) सैनिकाबरोबर लढणारे

(iii) शारीरिकदृष्ट्या सक्षम नसलेले

(iv) सैनिकांच्या कार्याचा अभिमान बाळगणारे देशवासीय

नाही मुठीमध्ये द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त,
काय करावें कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;
जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;
वर घोंघावे बंबारा,
पुढे कल्लोळ धुराचे,
धडाडत्या तोफांतून
तुझें पाऊल जिद्दीचें;
तुझी विजयाची दौड
डोळे भरून पहावी;
डोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी
अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्यांचे असें
तुला एकच औक्षण

(२) कृती करा. [०२]

(i) डोळे भरून पाहावे असे दृश्य – ☐

(ii) अपुरे वाटणारे सामर्थ्य – ☐

(३) प्रस्तुत कवितेतील खालील शब्दांचा अर्थ लिहा. [०२]

(i) औक्षण – ☐ (ii) द्रव्य – ☐

(iii) शौर्य – ☐ (iv) आसवे – ☐

(४) काव्यसौंदर्य :

'अशा असंख्य ज्योतींची तुझ्यामागून राखण' या ओळीतील अर्थसौंदर्य स्पष्ट करा. [०२]

**प्रश्न २. (आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा :**

| | मुद्दे | 'योगी सर्वकाळ सुखदाता' किंवा 'हिरवंगार झाडासारखं' | | |
|---|---|---|---|---|
| (१) | प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री – | | | १ |
| (२) | प्रस्तुत कवितेचा विषय – | | | १ |
| (३) | प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा – | जन निववी श्रवणकीर्तनें। निजज्ञानें उद्धरी।। | झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत धारण करून तपश्चर्या करत...... | २ |
| (४) | प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण – | | | २ |
| (५) | प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा – | (i) उदक –<br>(ii) मधुर –<br>(iii) तृषित –<br>(iv) क्षाळणे – | (i) मौन –<br>(ii) मुकाट –<br>(iii) वस्त्र –<br>(iv) बाहू – | २ |

## विभाग – ३ : स्थूलवाचन

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा :** [०६]

(१) 'प्रत्यक्ष अनुभवांतून शिकणे हे अधिक परिणामकारक असते', हे विधान 'मोठे होत असलेल्या मुलांनो' या पाठाधारे स्पष्ट करा.

(२) तुम्हांला समजलेली 'जाता अस्ताला' या कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

(३) टीप लिहा – व्युत्पत्ती कोशाचे कार्य.

## विभाग – ४ : भाषाभ्यास

**प्रश्न ४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

(१) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा. [०२]

(i) अक्षय दररोज अभ्यास करतो.

(ii) अहाहा! किती सुंदर देखावा हा!

(२) कंसातील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा. [०२]

(i) ही इमारत खूप उंच आहे. (उद्गारार्थी करा.)

(ii) आज पहाटे रानात उजेड नव्हता. (होकारार्थी करा.)

(३) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा. (फक्त दोन) [०४]

(i) मूठभर मांस वाढणे.

(ii) उत्साहाला उधाण येणे.

(iii) मळमळ व्यक्त करणे.

**प्रश्न ४. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**(१) शब्दसंपत्ती :**

(१) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. [०१]

(i) मित्र = ______ (ii) कनवाळू = ______

(२) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. [०१]

(i) लहान x ______ (ii) ज्ञान x ______

(३) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. [०१]

लिहिता वाचता येणारा – ______

(४) वचन बदला. [०१]

(i) ठसा – ______ (ii) शेंग – ______

**(२) लेखननियमांनुसार लेखन :**

खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा. [०२]

(i) पहिला दीवस सूरळीत गेला.

(ii) रात्रभरच्या वाटचालीने थकुन ती वीश्रांती घेत होती.

**(३) विरामचिन्हे :**

खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हांचा उपयोग करा. [०२]

(i) ''मावशी तुम्ही राहता कुठे''

(ii) ''शाबास छान खेळलास''

## विभाग – ५ : उपयोजित लेखन

**प्रश्न ५. (अ) खालील कृती सोडवा :** [०६]

**(१) पत्रलेखन :**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.

संत गाडगेबाबा विद्यालय,
संतभूमी चौक, अमरावती.
शाळेच्या 'विद्यार्थी मंडळ'
तर्फे आयोजित
'एकपात्री अभिनय स्पर्धा'
दि. ३ जानेवारी स. ११ वा.
sgbv.50@gmail.com
– मुख्याध्यापक

अशोक/आशा पवार, विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

| स्पर्धेसाठी शाळेचे सभागृह उपलब्ध करून देण्याची विनंती करणारे पत्र शाळेच्या मुख्याध्यापकांना लिहा. | **किंवा** | प्रथम पारितोषिक प्राप्त स्पर्धक स्वाती/सुयश देसाई यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. |
|---|---|---|

**किंवा**

**(२) सारांश लेखन :**

विभाग १ – गद्य (इ) (प्र. क्र. १-इ) मधील अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**प्रश्न ५. (आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा :** [१०]

**(१) जाहिरात लेखन :**

पुढील विषयावर जाहिरात तयार करा.

आयुर्वेदिक केशतेलाची आकर्षक जाहिरात तयार करा.

**(२) बातमी लेखन :**

खालील निवेदन वाचून बातमी तयार करा.

अभिनव विद्यालय, नागपूर
'भव्य विज्ञान प्रदर्शन' संपन्न
दि. १५ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर
वेळ स. ११ ते सं. ५ वाजेपर्यंत
अध्यक्ष – श्री सुहास माने
प्रमुख पाहुणे – श्री आशिष वाघ

* एकूण ५० शाळांचा सहभाग
* उद्घाटन सोहळा संपन्न
* उत्कृष्ट प्रकल्पांना पारितोषिके
* विज्ञान नाटिका सादर

**(३) कथालेखन :**

खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा.

एक गरीब मुलगा – शाळेची फी भरण्यास पैसे नसणे – सकाळी पेपर टाकण्याचे काम – वाटेत पैशाचे पाकीट मिळणे – प्रामाणिकपणे पोलीस स्टेशनवर नेऊन देणे – पाकिटाच्या मालकास आनंद – बक्षीस.

**प्रश्न ५. (इ) लेखन कौशल्य :** [०८]


खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा :

**(१) प्रसंगलेखन :**

आदर्श विद्यालय, कोल्हापूर
'मराठी भाषा दिन' सोहळा
दि. २७ फेब्रुवारी, स. १० वाजता
* काव्यवाचन * कथाकथन
* नाट्यप्रयोग * गीतगायन
विविधरंगी कार्यक्रमांची मेजवानी

वरील सोहळ्यास तुम्ही उपस्थित होतात अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

**(२) आत्मकथन :**
दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा.




**(३) वैचारिक :**
'निसर्ग आपला गुरू' या विषयावर तुमचे विचार मांडा.

## उत्तरपत्रिका

### विभाग – १ : गद्य

**पठित गद्य**

**प्रश्न १. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(१) चौकटी पूर्ण करा.** [०२]

**(i) उताऱ्यात आलेले नदीचे नाव –** कृष्णा

**(ii) बाळाची आई करत असलेला उद्योग –** मासे पकडणे/मासेमारी

* **(उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) आकृतीबंध पूर्ण करा.** [०२]

**उत्तर:**

**कार्यक्रमात नारायण सुर्वे यांना सन्मानाने मिळणाऱ्या वस्तू**

- शाल
- श्रीफळ

**(३) स्वमत.** [०३]

**'शाल व शालीनता' यांचा पाठाच्या आधारे तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा.**

**उत्तर:** 'शाल' हे सन्मानाचे प्रतीक आहे व 'शालीनता' हा सज्जन व्यक्तींचा स्वभावधर्म आहे. सज्जन माणसाला शाल दिली जाते म्हणजेच त्याचा सन्मान केला जातो. सज्जनाला म्हणजेच शालीन माणसाला शालीची आवश्यकताही नसते. त्याचा

स्वभावच सन्माननीय असतो. या उलट दुर्जन माणसाला शाल दिली तरी त्यात शालीनता येणार नाही. शालीनता हा गुणधर्म माणसात असावा लागतो तो शालीने प्राप्त होत नाही.

शाल देऊन एखाद्या सन्माननीय व्यक्तीचा सत्कार करणे ही आपली परंपरा आहे. यामुळे अशा सज्जन व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व अधिकच खुलते व समाजाला प्रेरणादायी व उत्साहवर्धक ठरते. म्हणून शाल ही आदरणीय, सन्माननीय व सज्जनांना देण्याची प्रथा रूजू झाली आहे.

**प्रश्न १. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(१) कोण ते लिहा.** **[०२]**

**(i) निरंजनचा सर्व खर्च करणारे –** भडसावळे गुरुजी

**(ii) निरंजनला मावशीकडे सोडून पुन्हा न परतलेला –** निरंजनचा मामा

*** (उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) का ते लिहा.** **[०२]**

**(i) निरंजन वार लावून जेवायचा, कारण** ________.

**उत्तर:** निरंजन वार लावून जेवायचा कारण त्याच्या मावशीची परिस्थिती यथातथाच होती.

**(ii) निरंजन झटून अभ्यास करायचा, कारण** ________.

**उत्तर:** निरंजन झटून अभ्यास करायचा, कारण त्याचा पहिला नंबर टिकून असे पर्यंतच गुरुजी त्याचा सारा खर्च करणार होते.

**(३) स्वमत.**

**तुम्हांला अभिप्रेत असलेली आदर्श विद्यार्थ्याची गुणवैशिष्ट्ये लिहा.** **[०३]**

**उत्तर:** विद्यार्थ्याला ज्ञानाची आवड असली पाहिजे. त्यासाठी सर्वप्रथम अभ्यासूवृत्ती व विनम्रता आदर्श विद्यार्थ्यात असणे आवश्यक आहे. आई-वडिलांसह आपल्या गुरुजनांचा, शिक्षकांचा आदर त्यांनी केला पाहिजे. वाचन, लेखनाची आवड त्याने जोपासली पाहिजे. शरीर व मनाने तो खंबीर व सशक्त असला पाहिजे. जिज्ञासूवृत्ती, परिश्रम व चिकाटी हे गुण आदर्श विद्यार्थ्यामध्ये असणे अत्यावश्यक आहे. स्वभावाने प्रेमळ, दिलदार, खिलाडूवृत्ती व मित्र जोडणारा स्वभाव आदर्श विद्यार्थ्यामध्ये असावा. अभ्यासाबरोबरच खेळ, नाट्य, संगीत, चित्रकला व साहित्याची आवड हे गुण आदर्श विद्यार्थ्यामध्ये असावेत.

जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहणे, सतत आनंदी आणि प्रसन्न राहणे तसेच परोपकारी वृत्ती असणे ही आदर्श विद्यार्थ्यांची गुणवैशिष्ट्ये आहेत.

## अपठित गद्य

**प्रश्न १. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(१) आकृतिबंध पूर्ण करा.** [०२]

**उत्तर:**

**संकटांकडे पाहण्याची दृष्टी अशी असावी**

- सोशिकपणा
- खिलाडू वृत्ती

*** (उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) कधी ते लिहा.** [०२]

**(i) आपण संकटांना का घाबरलो तेच आपल्याला समजत नाही.**

**उत्तर:** संकटे ओसरल्यावर, आपण संकटांना का घाबरतो तेच आपल्याला समजत नाही.

**(ii) आजारी, संकटग्रस्त माणसे आनंदमय जीवनाचा अनुभव घेत असतात.**

**उत्तर:** आजारी संकटग्रस्त माणसे जेव्हा थट्टा-विनोद करतात तेव्हा ती या आनंदमय जीवनाचा अनुभव घेत असतात.

## विभाग – २ : पद्य

**प्रश्न २. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** [०२]

**(१) योग्य पर्याय निवडा.**

**(1) सैनिकाचे औक्षण केले जाते........**

**उत्तर:** डोळ्यांतील आसवांच्या ज्योतींनी

**(2) कवितेतील 'दीनदुबळे' म्हणजे........**

**उत्तर:** सैनिकांच्या कार्याचा अभिमान बाळगणारे देशवासीय

*** (कविता कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) कृती करा.** [०२]

**उत्तर:**

(i) डोळे भरून पाहावे असे दृश्य – सैनिकाच्या विजयाची दौड

(ii) अपुरे वाटणारे सामर्थ्य – कष्टाचे

**(३) प्रस्तुत कवितेतील खालील शब्दांचा अर्थ लिहा.** [०२]

**उत्तर:** (i) औक्षण – ओवाळणे

(ii) द्रव्य - संपत्ती

(iii) शौर्य - पराक्रम

(iv) आसवे - अश्रू

**(४) काव्यसौंदर्य :**

**'अशा असंख्य ज्योतींची तुझ्यामागून राखण' या ओळीतील अर्थसौंदर्य स्पष्ट करा.** [०२]

**उत्तर:** देशाच्या सीमेवर आपल्या जीवाची बाजी लावून लढणाऱ्या सैनिकाविषयी कृतज्ञता 'औक्षण' या कवितेत कवयित्री इंदिरा संत यांनी व्यक्त केली आहे.

जवानांविषयी कृतज्ञता व्यक्त करताना दीनदुबळी जनता त्याला म्हणते, 'देशाचे व सर्वसामान्य जनतेचे सीमेवर रक्षण करताना जवान आपल्या जीवाची पर्वा करत नाही. अशावेळी जनतेच्या डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रू उभे राहतात. अशा असंख्य आसवांच्या ज्योतींने आम्ही तुला ओवाळतो आहे. देशातील या सर्वसामान्य जनतेच्या डोळ्यांत तेवणाऱ्या ज्योतींने आम्ही तुझी पाठराखण करणार आहोत.'

**प्रश्न २. (आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा :**

**'योगी सर्वकाळ सुखदाता' किंवा 'हिरवंगार झाडासारखं'**

**'योगी सर्वकाळ सुखदाता'**

**(१) प्रस्तुत कवितेचे कवी** [०१]

**उत्तर:** संत एकनाथ महाराज

**(२) प्रस्तुत कवितेचा विषय** [०१]

**उत्तर:** योगी पुरुष हा पाण्यापेक्षाही सर्वश्रेष्ठ आहे हे विविध दृष्टांतांतून पटवून दिले आहे.

**(३) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा.** [०२]

जन निववी श्रवणकीर्तनें।
निजज्ञानें उद्धरी।।

**उत्तर:** संत एकनाथ महाराजांच्या 'योगी सर्वकाळ सुखदाता' या अभंगात योगी पुरुषाचे महत्त्व पटवून देणाऱ्या या काव्यपंक्ती आहेत. या ओळीत योगी पुरुषाची महती स्पष्ट करताना संत एकनाथ म्हणतात, 'आकाशात पाण्याने भरलेला ढग पृथ्वीवर पावसाच्या रूपाने बरसतो व त्यामुळे पृथ्वीवर निर्माण झालेल्या विपुल अन्नधान्यांनी भूतलावरील माणसे तृप्त होतात. याचप्रमाणे योगी पुरुष या इहलोकात मानवरूपाने जन्म घेतो. त्याच्या आत्मज्ञानाच्या श्रवणाने व त्यांनी केलेल्या भक्तीमय, रसमय अशा निरूपणाने भूतलावरील जनमानसाचा उद्धार होतो.

**(४) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण** [०२]

**उत्तर:** संत एकनाथ महाराज यांचा 'योगी सर्वकाळ सुखदाता' हा अभंग मला आवडला. या अभंगात दिलेली उदाहरणे अत्यंत समर्पक व सर्वसामान्य वाचकाला समजतील अशी आहेत. योगी पुरुष आणि पाण्याची तुलना करून योगी पुरुष हा सर्वश्रेष्ठ कसा आहे हे सांगितले आहे. चकोर पक्षी, आकाशातील पाण्याने भरलेले ढग तहानलेला मनुष्य, जीभेचा गोडवा ही समर्पक उदाहरणे म्हणजे एकनाथ महाराजांच्या अभंगातील गोडवा व सहजसुंदरता स्पष्ट करतो व मनाला भावतो. म्हणूनच हा अभंग स्मरणात राहतो.

**(५) प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा.** [०२]

(i) उदक – पाणी, जल

(ii) मधुर – गोड

(iii) तृषित – तहानलेला

(iv) क्षाळणे – धुणे

**किंवा**

**'हिरवंगार झाडासारखं'**

**(१) प्रस्तुत कवितेचे कवी** [०१]

**उत्तर:** जॉर्ज लोपीस

**(२) प्रस्तुत कवितेचा विषय** [०१]

**उत्तर:** झाडासारखे आनंदी जीवन जगण्यासाठी माणसाने झाडाचे गुण अंगी बाणवावेत हा विचार या कवितेत मांडला आहे.

**(३) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा.** [०२]

झाड बसते
ध्यानस्थ ऋषिसारखं
मौन व्रत धारण करून
तपश्चर्या करत.....

**उत्तर:** ''हिरवंगार झाडासारखं' या कवितेत कवी जॉर्ज लोपीस यांनी माणसाने झाडासारखे सहनशील, परोपकारी राहून संकटात एकदुसऱ्याला साथ देऊन ठामपणे उभे राहण्याचा संदेश दिला आहे.

एखादा ऋषीमुनी मौनव्रत धारण करून ध्यानस्थपणे तपश्चर्या करीत बसतो

त्याचप्रमाणे झाडही शांतपणे अबोल होऊन ध्यानस्थ बसते. माणसानेही झाडाचे गुण आत्मसात करून अंगी बाणवावेत.

**(४) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण** **[०२]**

**उत्तर:** जॉर्ज लोपीस यांची 'हिरवंगार झाडासारखं' ही कविता मनापासून आवडली याचे कारण म्हणजे कवितेचा विषय.

माणसानेही झाडासारखं सहनशील, परोपकारी राहून संकटात एक दुसऱ्यांना साथ देऊन ठामपणे उभे राहण्याचा संदेश दिला आहे तो मनाला पटतो.

निसर्गाचा एक घटक आपणास जीवनाचे मर्म सांगतो, सद्गुण जोपासण्याची वृत्ती दर्शवतो. हे सहजपण झाडाच्या उदाहरणातून दिसते म्हणून कविता मनाला स्पर्शून जाते.

**(५) प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा.** **[०२]**

(i) मौन – न बोलणे

(ii) मुकाट – शांत

(iii) वस्त्र – कपडे

(iv) बाहू – हात

## विभाग – ३ : स्थूलवाचन

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा :** [०६]

**(१) 'प्रत्यक्ष अनुभवांतून शिकणे हे अधिक परिणामकारक असते', हे विधान 'मोठे होत असलेल्या मुलांनो' या पाठाधारे स्पष्ट करा.**

**उत्तर:** रोजनिशी लिहिण्याची सक्ती करण्यात आली होती. आईने दुकानात जाऊन विशेष डायरी आणण्यास सांगितली. दुकानात गेलो तर 'रोजनिशी' डायरीची किंमत दोनशे ते अडीचशे रुपये होती. घरी आलो, जुन्या वह्या काढल्या. अनेक वह्यांमधली कोरी पाने एकत्र केली. दादाची मदत घेतली. त्याच्या इंजिनियरिंगच्या अभ्यासाच्या वह्यांचे कडक पुठ्ठे व कोरे कागद एकत्र करून छानशी डायरी मी तयार केली. त्यावर सुंदर चित्र काढले. जुन्या कॅलेंडरचा आधार घेऊन छानशी रोजनिशी तयार करून रोज मी त्यात लिहू लागलो. प्रत्यक्ष अनुभवातून निर्मिती व लेखनाचा आनंद वेगळाच असतो हे अनुभवले.

**(२) तुम्हांला समजलेली 'जाता अस्ताला' या कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.**

**उत्तर:** गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या बंगाली कवितेचे स्वैर रूपांतर श्यामला कुलकर्णी यांनी केले आहे. सूर्य आणि पणतीच्या प्रतीकाद्वारे अगदी छोट्या जीवातही

जगाला काहीतरी देण्याची, जग सुंदर करण्याची क्षमता असते हे सांगितले आहे. सूर्य आणि पणती ही दोन्ही तेजाची प्रतीके आहेत. आकाशात असलेला सूर्य पृथ्वीला ऊर्जा व प्रकाश देतो. सूर्यामुळे मानवी जीवन अस्तित्वात आहे. सूर्याचा प्रकाश महाकाय व तेजःपुंज असतो. तो जेव्हा मावळतो त्यावेळी त्याच्या मनात आपल्यानंतर पृथ्वीवर काय होईल? पृथ्वी अंधारात बुडेल. माझ्यासारखा प्रकाश पृथ्वीला कोण देईल? या प्रश्नाने त्याचे डोळे पाणवतात. यातून सूर्याचे पृथ्वीवर असलेले नितांत प्रेम व प्रेमापोटी असलेली काळजी सुंदर शब्दात व्यक्त केली आहे.

**(३) टीप लिहा – व्युत्पत्ती कोशाचे कार्य.**

**उत्तर:** एखाद्या शब्दाबद्दलचे कुतूहल व त्याच्या निर्मितीच्या अर्थाचे मूळ ज्ञान पाहण्यासाठी आपण व्युत्पत्ती कोशाची मदत घेतो.

व्युत्पत्ती कोशामध्ये मूळ शब्द केव्हा, कुठे व कसा निर्माण झाला ते समजते. व्युत्पत्ती कोशाचे कार्य पुढीलप्रमाणे चार प्रकारे चालते.

(१) शब्दाचे मूळरूप दाखवणे. मराठी भाषेतील प्रमाण, बोली रूप व अर्थ दर्शविणे.

(२) भाषेतील प्रादेशिक व भौगोलिक रूपाप्रमाणे उच्चारातील बदल व फरक दाखवणे.

(३) शब्दांचे अर्थ भिन्न काळात व इतिहासाच्या दृष्टीने बदलतात. या बदलांचा फरक स्पष्ट करणे.

(४) शब्दांचे अर्थ भिन्न-भिन्न समाजात वेगवेगळ्या कारणांनी, अर्थाच्या अनुषंगाने बदलतात, ते बदल स्पष्ट करणे.

## विभाग – ४ : भाषाभ्यास

**प्रश्न ४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

**(१) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.** [०२]

**(i) अक्षय दररोज अभ्यास करतो.**

**उत्तर:** विधानार्थी वाक्य

**(ii) अहाहा! किती सुंदर देखावा हा!**

**उत्तर:** उद्गारार्थी वाक्य

**(२) कंसातील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा.** [०२]

**(i) ही इमारत खूप उंच आहे.** **(उद्गारार्थी करा.)**

**उत्तर:** किती उंच आहे इमारत ही!

**(ii) आज पहाटे रानात उजेड नव्हता.** **(होकारार्थी करा.)**

**उत्तर:** आज पहाटे रानात काळोख होता.

**(३) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा. (फक्त दोन)** **[०४]**

**(i) मूठभर मांस वाढणे – स्तुतीने हुरळून जाणे.**

**उत्तर:** वर्गात मुख्याध्यापकांनी अमरची स्तुती केल्याने अमरच्या अंगावर मूठभर मांस वाढले.

**(ii) उत्साहाला उधाण येणे – खूप आनंद होणे.**

**उत्तर:** वेळेवर पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्साहाला उधाण आले.

**(iii) मळमळ व्यक्त करणे –नाराजी व्यक्त करणे.**

**उत्तर:** दिलेले काम वेळेत पूर्ण न केल्याने मालकांनी कामगारांसमोर मळमळ व्यक्त केली.

**प्रश्न ४. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**(१) शब्दसंपत्ती :**

**(१) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **[०१]**

(i) मित्र = सखा (ii) कनवाळू = दयाळू

**(२) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **[०१]**

(i) लहान x मोठा (ii) ज्ञान x अज्ञान

**(३) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **[०१]**

लिहिता वाचता येणारा – साक्षर

**(४) वचन बदला.** **[०१]**

(i) ठसा – ठसे (ii) शेंग – शेंगा

**(२) लेखननियमांनुसार लेखन :**

**खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.** **[०२]**

**(i) पहिला दीवस सूरळीत गेला.**

**उत्तर:** पहिला दिवस सुरळीत गेला.

**(ii) रात्रभरच्या वाटचालीने थकुन ती वीश्रांती घेत होती.**

**उत्तर:** रात्रभरच्या वाटचालीने थकून ती विश्रांती घेत होती.

**(३) विरामचिन्हे :**

**खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हांचा उपयोग करा.** **[०२]**

**(i) ''मावशी तुम्ही राहता कुठे''**

**उत्तर:** ''मावशी, तुम्ही राहता कुठे?''

**(ii) ''शाबास छान खेळलास''**

**उत्तर:** ''शाबास! छान खेळलास.''

## विभाग – ५ : उपयोजित लेखन

**प्रश्न ५. (अ) खालील कृती सोडवा :** [०६]

**(१) पत्रलेखन :**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**

दिनांक: १ जानेवारी, २०२२

प्रति,

माननीय मुख्याध्यापक,

संत गाडगेबाबा विद्यालय,

संतभूमी चौक,

अमरावती.

**विषय :** शालेय स्पर्धेसाठी सभागृह उपलब्ध करून देण्याबाबत.

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार.

मी अशोक पवार, आपल्या शाळेतील विद्यार्थी प्रतिनिधी आहे. शाळेतील 'विद्यार्थी मंडळातर्फे' दरवर्षी प्रमाणे यावर्षीही 'एकपात्री अभिनय स्पर्धा' आपल्या शाळेत ३ जानेवारी २०२२ रोजी सकाळी अकरा वाजता आयोजित करण्यात आली आहे. आपल्या शाळेतील वातानुकुलीत सभागृह स्पर्धेसाठी उत्तम असल्याने ही जागा निश्चित केली आहे.

कोवीड-१९ च्या प्रदिर्घ काळानंतर प्रथमच अशी स्पर्धा आयोजित होत असल्याने विद्यार्थी स्पर्धक जास्त प्रमाणात सहभागी होणार आहेत.

आपण आमच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आपले शाळेचे सभागृह स्पर्धेसाठी उपलब्ध करून द्यावे ही नम्र विनंती.

आपला नम्र,

अशोक पवार

(विद्यार्थी प्रतिनिधी)

साई सदन २,

संत गाडगेबाबा चौक,

अमरावती.

ई-मेल आयडी – sgbv.50@gmail.com

**(किंवा)**

**उत्तर:**

दिनांक: ५ जानेवारी, २०२२

सुयश देसाई

नंदादीप सोसायटी ३,

संत ज्ञानेश्वर चौक,

अमरावती.

प्रिय मित्र सुयश

सप्रेम नमस्कार.

वर्तमानपत्रातील तुझा फोटो व बातमी पाहून फारच आनंद झाला. आंतरशालेय 'एकपात्री अभिनय स्पर्धेत' तुला प्रथम क्रमांक प्राप्त झाला याबद्दल तुझे हार्दिक अभिनंदन!

तुझा अभिनय नेहमीच चांगला असतो. एक जिवंतपणा तू भूमिकेत आणतोस हे आम्ही पाहिले आहे. तुझ्या मेहनतीमुळेच तुला हे अपूर्व यश प्राप्त झाले आहे.

जीवनात नेहमीच असा यशस्वी हो ही शुभेच्छा! आम्हा सर्वांनाच तुझा अभिमान आहे. तुझ्या पुढील उज्ज्वल आयुष्यासाठी पुनःश्च शुभेच्छा व यशाबद्दल अभिनंदन!

तुझा मित्र,

अशोक पवार

साई सदन २,

संत गाडगेबाबा चौक,

अमरावती.

ई-मेल आयडी - sgbv.50@gmail.com

**(किंवा)**

**सारांश लेखन :**

✻ **(प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** संकटाला न घाबरता त्याला धैर्याने सामोरे जावे. जीवनात येणाऱ्या अडचणी व संकटे आकाशातील मळभासारखी असतात. थट्टा, विनोदातही आनंदी जीवनाचा खरा अनुभव घेता येतो. आपण मनःशांती प्राप्त करू शकतो.

**प्रश्न ५. (आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** [१०]

**(१) जाहिरात लेखन :**

✻ **(प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**



*लांब सडक केसांसाठी*

आयुर्वेदिक जडीबुटीने युक्त

सहा महिन्यातच रिझल्ट

वनस्पती व नारळाचे तेल वापरून तयार केलेले

## सुगंधी "महाभृंगराज" तेल

रात्री झोपताना लावल्यावर शांत झोप व सुगंधी असल्याने मन प्रसन्न

रोज वापरा घरातील सर्वांसाठी एकच तेल

**"महाभृंगराज" तेल**

**२००, ५०० व १००० मिली मध्ये उपलब्ध**

सर्वत्र उपलब्ध

**संपर्क साधा :** ९८६७०४८६७२

ई-मेल आयडी - udoil@gmail.com

(२) **बातमी लेखन :**

**खालील निवेदन वाचून बातमी तयार करा.**

✲ **(प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**

**✲ भव्य विज्ञान प्रदर्शन ✲**

आमच्या वार्ताहराकडून, दि. १९ ऑक्टोबर

महाराष्ट्र राज्याच्या राज्यस्तरीय 'भव्य विज्ञान प्रदर्शनाचे' आयोजन अभिनव विद्यालय, नागपूर येथे करण्यात आले होते. राज्यातील पन्नास शाळांतील बाल वैज्ञानिकांनी १५ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर या काळात आपली कला या भव्य विज्ञान प्रदर्शनात सादर केली.

विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे अभिनव विद्यालयाचे संस्थापक श्री. आशिष वाघ व संस्थेचे अध्यक्ष श्री. सुहास माने उपस्थित होते. दीप प्रज्ज्वलनाने उद्घाटन झाले. या प्रसंगी शाळेतील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चार दिवस आयोजित केलेले हे भव्य विज्ञान प्रदर्शन सकाळी अकरा ते संध्याकाळी पाच वाजेपर्यंत विज्ञानप्रेमींसाठी खुले होते. हजारो विद्यार्थी व पालकांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला व आपली वैज्ञानिक दृष्टी विकसित केली.

---

आधुनिकता व वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांनी सुंदर विज्ञान नाटिका सादर केली होती. जनतेचा प्रतिसाद व विज्ञान शिक्षकांनी दिलेल्या अभिप्रायावरून उत्कृष्ट प्रकल्पांना व प्रयोगांना पारितोषिके जाहिर करण्यात आली.

(३) **कथालेखन :**

✲ **(मुद्दे कृतिपत्रिकेत पाहा.)**

**प्रामाणिकपणाचे फळ**

**उत्तर:** अमर हा रोज पहाटे उठून रेल्वे स्टेशनवर जात असे. कारण सकाळीच पहिल्या गाडीने येणारे पेपर घेऊन तो पेपर टाकण्याचे काम करत असे. गरिबीमुळे शाळेची फी भरणे व आपला उदरनिर्वाह करणे त्याला शक्य नव्हते. यामुळे थंडी असो, ऊन असो की पाऊस असो नित्यनेमाने तो पेपर टाकण्याचे काम करत असे.

एक दिवस घरी जात असताना रस्त्यात एक पाकीट अमरला दिसले. ते पाकीट घेऊन तो घरी आला. आपल्या आजारी आईला दाखवले. पाकीट उघडताच त्यामध्ये दोन-दोन हजारांच्या पंचवीस नोटा, आधारकार्ड, पॅनकार्ड व काही कागदपत्रे होती. ते पाहताच अमर भांबावून गेला. पण तो स्वतःला सावरत आईला म्हणाला, ''मी हे पाकीट पोलीस स्थानकात नेऊन देतो.''

अमरने रस्त्यात सापडलेले पैशांचे पाकीट पोलीस स्टेशनवर नेऊन दिले. पाकीटातील कागदपत्रे व आधारकार्डवरून पोलीसांनी पाकीटाच्या मालकाला शोधले व त्याचे पाकीट त्याला परत दिले. पाकीटाचा मालक एक धनाढ्य बिल्डर होता. अमरच्या प्रामाणिकपणाचे त्याला कौतुक वाटले व त्यांनी काही रक्कम अमरला बक्षीस म्हणून दिली तसेच त्याच्या शिक्षणाचा पूर्ण खर्च उचलण्याचे जाहिर केले.

आजच्या कलियुगातही अमरसारखी प्रामाणिक मुले आहेत याचा आनंद मालकाला झाला व पोलीसांनीही अमरचा सत्कार केला.

**तात्पर्य:** प्रामाणिकपणाचे फळ नेहमी चांगलेच मिळते.

**प्रश्न ५. (इ) लेखन कौशल्य :** [०८]

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा :**

**(१) प्रसंगलेखन :**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**माझी माय मराठी**

**उत्तर:** ज्ञानपीठ विजेते, मराठी साहित्यातील मुकुटमणी श्री. विष्णू वामन शिरवाडकर म्हणजेच 'कुसुमाग्रज' यांचा जन्मदिवस २७ फेब्रुवारी १९१२ ला झाला. हा दिवस 'मराठी भाषा दिन' म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा होतो.

आदर्श विद्यालय, कोल्हापूर येथे २७ फेब्रुवारी रोजी 'मराठी भाषा दिन' आयोजित केला होता. शाळेतील विद्यार्थ्यांनी सभामंडप गजबजून गेला होता. पारंपरिक मराठी पद्धतीने विद्यार्थी सजले होते. मुलींची नऊवारी साडी, मुलांचे पुणेरी फेटे, तर काहींचे कोल्हापूरी धोतर, साताऱ्याची पांढरी टोपी तर काही चक्क शेतकरी वेशात शाळेत आले होते.

संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानाने मराठी भाषा दिनास सुरुवात झाली. संत एकनाथांचे भारूड व मराठी लावणीने कार्यक्रमात रंगत आली. व.पुं.च्या व पु.ल. देशपांडे यांच्या कथाकथनाने सभागृह हास्यकल्लोळात बुडाले. गीतगायन व काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन यावेळी करण्यात आले होते.

महाराष्ट्राची राज्यभाषा म्हणून मराठी भाषेचे असलेले महत्त्व यादिवशी सर्वांनीच ओळखले होते. अनेक परप्रांतीय लोक या कार्यक्रमास उपस्थित होते.

'माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगाने जागल्या
दऱ्याखोऱ्यातील शिळा'

या काव्यपंक्तीला मराठी रसिक प्रेक्षकांनी चांगल्याप्रकारे दाद दिली.

'अमृताते ही पैजा जिंकणाऱ्या' मायमराठीचा गौरव करण्याचा, आपल्या भाषेबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस. मराठी माणसाने विविध क्षेत्रात दाखवलेल्या कर्तृत्त्वाचा उल्लेख करून संबंधित व्यक्तींचा सत्कार या कार्यक्रमात करण्यात आला.

'लागले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरंच धन्य ऐकतो मराठी....
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी'

असे विद्यार्थ्यांनी एका सुरात म्हणून उपस्थितांची मने जिंकली.

विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या मेजवानीच्या बेताबरोबरच, झुणका भाकर, वांग्याचे भरीत व पुरणपोळीचा आस्वादही मराठी भाषा दिन सोहळ्यात घेता आला.

**(२) आत्मकथन :**

**※ (मुद्दे कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर: वृक्षाचे आत्मवृत्त**

ढगांचा गडगडाट, विजेचा चमचमाट आणि तुफानी वारा यांनी नुसते थैमान घातले होते. जवळ छत्री नव्हती. धावत-धावत मी जवळच्या वडाच्या झाडाखाली जाऊन उभी राहिले तेवढ्यात कोणाचा तरी आवाज आला.

''या बाजूला उभी राहा म्हणजे भिजणार नाहीस!'' कोण बोलले? या विचाराने मी दचकले. तेवढ्यात... ''घाबरू नकोस. मी तुझ्या घराजवळचे वडाचे झाड बोलतो आहे. बरं झालं आज आलीस ती. आता थोड्या गप्पा मारू.''

''माझा जन्म खूप वर्षांपूर्वी या नदीकिनारी झाला. मला आठवते की मला ज्यावेळी नुकताच अंकुर फुटायला लागला होता. माझी अवस्था खूप नाजूक होती. माझे अस्तित्व शिल्लक राहते किंवा नाही अशीच माझी अवस्था होती. मग मात्र मी वाढीस लागलो तेव्हापासूनची आठवण मनात ताजी आहे.''

''या गावात किती तरी बदल झाले. येथील तरुण पिढी आपले भविष्य घडविण्यासाठी गावाबाहेर पडली. पण जाताना माझा आशीर्वाद घ्यायला कधीच विसरली नाहीत. पशुपक्ष्यांनाही माझा खूप आधार वाटतो. माझ्यात आणि येथील गावकऱ्यात एक प्रकारचा जिव्हाळा आहे.''

''आमच्या अस्तित्वामुळे भरपूर पाऊस पडतो. भरपूर अन्नधान्याचे उत्पादन होते. पण आज माणसाने निरुपयोगी झाडे कापा असा अविचाराने निर्णय घेतला त्यामुळे वृक्षतोड व्हायला सुरुवात झाली. भरमसाट वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे राहण्यासाठी जागा हवी. मग तोडा झाडे आणि बांधा घरे. पण या अविचारी कृत्यामुळेच दुष्काळ पडण्याची, माणसे भुकेने मरण्याची संकटे टाळता येणार नाहीत.''

''हळूहळू माझे रूपांतर आता वटवृक्षात झाले होते. फांद्या वाढून जमिनीत रुजल्या व त्यामुळे मूळचे खोड अधिक भक्कम झाले. पक्ष्यांना फळे देऊन मी त्यांचा आनंद द्विगुणीत करतो. मानवजातीची सेवा हा माझा धर्म आहे. पण एकच विनंती करतो की झाडे तोडण्यापूर्वी त्या ठिकाणी नवीन वृक्षारोपण करा. म्हणजे मानव व निसर्ग यातील समतोल बिघडणार नाही.''

''आम्ही ऑक्सिजन वायू श्वासावाटे बाहेर सोडतो त्यामुळे हवा नेहमी शुद्ध राहते. सर्वांना आम्ही निवारा देतो. आम्ही निसर्गाचे व माणसाचे वैभव आहोत म्हणून आमचे जतन करणे तुम्हा मनुष्यजातीलाच फ ायदेशीर आहे.''

''हे बघ, थांबला पाऊस! जा घरी झटकन आता.'' पाऊस थांबला होता. झाडाकडे पाहिले व गालातल्या गालात हसत मी झपाझप पावले टाकत घराकडे यायला निघाले.

**(३) वैचारिक :**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** **निसर्ग आपला गुरू**

मानवाचा सर्वात जवळचा संबंध जर कोणाशी असेल; तर तो निसर्गाचा. निसर्ग व मानव यांचे नाते अतूट आहे. दोघांचेही जीवन एकमेकांवर अवलंबून आहे. निसर्ग

``

मानवाला सुखी व समृद्ध करतो.

आकाशातील चंद्र, सूर्य, तारे तर पृथ्वीवरील झाडे, पाने, फुले, नद्या, समुद्र, पक्षी, धरती हे निसर्गाचे घटक आहेत. निसर्ग मानवाला जीवन देतो, तर निसर्गाचा प्रकोप माणसाला उद्ध्वस्त करतो. निसर्ग माणसाला अनुभव शिक्षण देतो. या निसर्गाचे रक्षण करणे प्रत्येक माणसाचे कर्तव्य आहे.

माझा आणि निसर्गाचा जवळचा संबंध आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मी निसर्गाच्या सान्निध्यात असतो. सकाळी उठल्याबरोबर ताज्या हवेत मी सकाळीच उठून रपेट करायला जातो. सूर्याचे दर्शन घेऊन मी माझ्या नित्य कामाला सुरुवात करतो. तुळशीवृंदावनला पाणी घालणे हा माझा नित्यक्रम. संध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळी दिवे लागण होताच आजही आम्ही अंगणात प्रार्थनेला बसतो. जेवल्यानंतर बागेत शतपावली करणे हे माझ्या अंगवळणी पडले आहे.

निसर्ग सध्या बदलत चालला आहे. त्याचे कारण म्हणजे मानवाने निसर्गावर केलेले अतिक्रमण, बेसुमार वृक्षतोड, समुद्रावर भरणी टाकून इमारती उभारणे, डोंगर तोडून त्या ठिकाणी वसाहत निर्माण करणे, प्रदूषण यामुळे निसर्गाचा समतोल पूर्णपणे बिघडला आहे. दुष्काळाची अवस्था देशाला प्राप्त झाली आहे.

निसर्ग बदलला कारण माणूस बदलला. आतातरी माणसाने जागृत झाले पाहिजे व पर्यावरणाचे पर्यायाने निसर्गाचे रक्षण केले पाहिजे.

★★★